साप्रवि/गट-८(रवका)/न.क्र.३२७/
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
तळ मजला,धारावी रोड,माटुंगा
*मुंबई* - *४०००१९.*

# प्रशासकीय परिपत्रक क्र.०२ दि.४/१०/२००५

विषय : अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) नियम २००१ - शासनाची अधिसूचना.

वाचा : १) प्रशासकीय परिपत्रक क्र.३८० दि.१०.२.२००३
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.४०७ दि.८.१.२००४
३) प्रशासकीय परिपत्रक क्र.४२८ दि.९.८.२००४
४) स.सा.स्था.आ.क्र.११२ दि.१२.२.६२ चे सु.प.क्र.२८५ दि.३.१२.२००४

......

"अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५" आणि "अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) नियम २००१" अनुक्रमे स.सा.स्था.आदेश क्र.११२ दि.१२.२.६२ चे सु.प.क्र.२८५ दि.३.१२.२००४ आणि प्रशासकीय परिपत्रक क्र.४०७ दि.८.१.२००४ अन्वये पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळाच्या संबंधीत कार्यालयांनी करावयाच्या कार्यवाहीसाठी प्रसृत करण्यात आले होते. त्याचप्रमाणे याबाबत शासनाने निर्गमित केलेल्या महत्वाच्या सूचना प्रशासकीय परिपत्रक क्र.४२८ दि.९.८.२००४ अन्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना योग्य त्या कार्यवाहीसाठी देण्यात आल्या होत्या.

२. आता, कक्ष अधिकारी,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांनी त्यांच्या दि.१.९.२००५ च्या पत्रासोबत उच्चतम न्यायालयाच्या दि.२३.१२.२००४ च्या आदेशाप्रमाणे गठीत केलेल्या समितीने पूर्वीच्या म.रा.वि.मंडळाच्या आस्थापनेवरील शारिरीकदृष्टया अपंग व्यक्तींसाठी आरक्षित व निश्चित केलेल्या सुयोग्य पदांच्या यादीची सुधारित प्रत पाठविली आहे. या सुधारित यादीमध्ये अपंगाच्या प्रवर्गासाठीचे आरक्षण काही पदांसाठी बदलण्यात आले आहे.

३. कक्ष अधिकारी,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांचे दि.१.९.२००५ चे पत्र व अपंगांसाठी आरक्षित व निश्चित केलेल्या सुयोग्य पदांच्या यादीची सुधारित प्रत माहितीसाठी, मार्गदर्शनासाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे. सर्व संबंधितांना विनंती करण्यात येते की, त्यांनी शारीरिकदृष्टया अपंग व्यक्तींसाठी आरक्षित व निश्चित केलेल्या सुयोग्य पदांवर सरळसेवेने उमेदवाराची भरती करताना सुधारित सूचनांचा अवलंब करावा आणि आरक्षण निश्चित करावे.

४. परिणामी, स.सा.स्था.आ.क्र.११२ दि.१२.२.६२ चे सु.चि.क्र.२८५ दि.३.१२.२००४ च्या सोबत जोडलेल्या पदांच्या यादी आता रद्द ठरविण्यात येत आहे.

५. हे प्रशासकीय परिपत्रक व्यवस्थापकीय संचालक (म.रा.वी.वि.कं.म.) यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सोबत : पदांची सुधारित यादी
(पृष्ठ १ ते ९)

**महा व्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)**

प्रत :
कार्यकारी अभियंता व त्यावरील दर्जाचे अधिकारी,(म.रा.वी.वि.कं.म.)
यांना प्रेषण यादीप्रमाणे.